स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**मुख्य कार्यालय, विरार**
**विरार (प.),**
**ता. वसई, जि. पालघर, पिन 401 303.**

दुरध्वनी : 0250-2525105/06/2529888/2529890
फॅक्स : 0250-2525107
ई-मेल : vasaivirarcorporation@yahoo.com

**जावक क्र. : व.वि.श.म./ / /25-26**
**दिनांक :** १६/०४/२०२५

# प्रेसनोट

**वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील मुंबई- अहमदाबाद महामार्ग क्र. 48 वरील नाल्यांची कामे पावसाळ्यापूर्वी पूर्ण करून घेणेबाबत मा. अतिरिक्त आयुक्त यांनी राज्य महामार्ग प्राधिकरण व इतर संबंधित विभागांना दिल्या सूचना...**

वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील मुंबई-अहमदाबाद महामार्ग क्र. 48 वरील सखल भागांमध्ये पावसाळ्यात पाणी साचून रहदारीस अडथळा निर्माण होण्याच्या पार्श्वभूमीवर, दिनांक 16 एप्रिल 2025 रोजी सकाळी 11.00 वाजता वर्सोवा खाडी (घोडबंदर ब्रिज) येथून ते विरार फाटा पर्यंत मा. अतिरिक्त आयुक्त श्री.संजय हेरवाडे यांच्या उपस्थितीत पाहणी दौरा संपन्न झाला.

या दौऱ्यात वसई चे प्रांत अधिकारी श्री.शेखर घाडगे, एन एच 48 महामार्गाचे प्रकल्प अधिकारी श्री. सुहास चिटणीस, महानगरपालिकेचे प्र.शहर अभियंता श्री.प्रदीप पाचंगे, कार्यकारी अभियंता श्री.प्रकाश साटम व श्री.संजय कुलकर्णी, उपायुक्त श्री.समीर भुमकर, श्री.दीपक झिंझाड, श्री.दिपक सावंत, सहाय्यक आयुक्त श्री. विश्वनाथ तळेकर, श्री.निलेश म्हात्रे, श्री.विजय शिंदे, वीज वितरण महामंडळाकडून कार्यकारी अभियंता श्री.गिरीश भगत व अनंत, तसेच पोलीस प्रशासन व वाहतूक शाखेतील वरिष्ठ अधिकारी व इतर कर्मचारी उपस्थित होते.

पाहणी दरम्यान सखल भागांतील स्थिती व नाळ्यांची पाहणी करून पावसाळ्यापूर्वी आवश्यक त्या सुधारणा व उपाययोजना करण्याचे निर्देश मा.अतिरिक्त आयुक्त महोदयांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले.

सदर दौऱ्याचा उद्देश संभाव्य ठिकाणी पाणी साचून राहू नये, यासाठी योग्य ती पूर्व तयारी करणे हा असून प्रशासनातील सबंधित सर्व विभाग त्यानुसार पुढील कार्यवाही तात्काळ सुरू करणार आहेत.

मुख्य कार्यालय
वसई विरार शहर महानगरपालिका